# संस्कृत विद्यापीठाची चमकदार कामगिरी

**म.टा.प्रतिनिधी, नागपूर**

तिरुपती येथील राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठाच्यावतीने आयोजित अखिल भारतीय विद्यार्थी प्रतिभा समारोहात कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी केली. ३० जानेवारी ते २ फेब्रुवारीदरम्यान हा समारोह आयोजित करण्यात आला होता. या टॅलेन्ट फेस्टिव्हलमध्ये भारतातील एकूण २२ विद्यापीठांनी सहभाग घेतला होता.

भारतातील सर्व संस्कृत विद्यापीठांतील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणाऱ्या या छात्र-प्रतिभा उत्सवात कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाची १२ विद्यार्थ्यांची चमू



सहभागी झाली होती. या चमूने संस्कृत वक्तृत्व, गीतगायन, लोकनृत्य, नाटक, एकपात्री अभिनय, रसप्रश्न इत्यादी विविध स्पर्धांमध्ये भाग घेतला.

या विविध स्पर्धांपैकी संस्कृत लोकनृत्य स्पर्धेत विद्यापीठाच्या चमूला सुवर्णपदक मिळाले. संस्कृत गीतगायन स्पर्धेत प्राची भट या विद्यार्थिनीला उत्तेजनार्थ पुरस्कार मिळाला. 'मूकक्रन्दनम्' हा एकपात्री अभिनय सादर करणाऱ्या गौरी सोनटक्के हिने कांस्य पदक प्राप्त केले. याशिवाय 'गुरुदक्षिणा' या डॉ. विभा क्षीरसागर लिखित संस्कृत नाटकाची संस्कृतप्रेमी रसिक श्रोत्यांनी विशेष दाद मिळवली. या टॅलेन्ट फेस्टिव्हलमध्ये सहभागी चमूत श्रीवरदा म्हाळगे, गौरी सोनटक्के, दिव्यानी अनमोलवार, वैष्णवी दाभेकर, वृषाली दाणी, वेदश्री आर्वीकर, माधुरी वैद्य, प्राची भट, अमित मुळे,सत्यजित खताळ, अनुज शर्मा व परीक्षित झोडेकर या विद्यार्थ्यांचा समावेश होता.

विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. उमा वैद्य आणि कुलसचिव डॉ. अरविंद जोशी, सांस्कृतिक समितीच्या समन्वयिका डॉ. नंदा पुरी यांनी विजयी चमूचे अभिनंदन केले आहे. डॉ. कविता होले, प्रा. पराग जोशी, डॉ. जयवंत चौधरी व डॉ. रेणुका बोकारे यांच्या नेतृत्वाखाली ही चमू या संमेलनात सहभागी झाली होती.